# आजचा युवक

आजचा युवक भ्रमित, निराश व बहुतेक करुन दिशाहिन आहे. त्याच्या जीवनाला लक्ष्य राहिलेले नाही. जसे की, स्वामी विवेकानंदानी म्हटले आहे की, 'प्रत्येक आत्मा दिव्यतेने भरपूर आहे, प्रत्येक युवक मौलिक रुपाने गुणवान आहे. सकारात्मक, रचनात्मक व नवनिर्माता आहे'.

दुर्भाग्यतेने युवकाचा हा चमकदार चेहरा वर्तमान पद्धतीच्या सर्पदंशाने विकृत झाला आहे. या नकारात्मकतेचे मुळ कारण हे आहे. आपल्या आंतरिक आवश्यकतांना सकारात्मक विचार आणि रचनात्मक तथ्यांनी भरपूर करण्याऐवजी कठपुतळ्याप्रमाणे बाहेरील प्रवाहांवर अवलंबून राहत आहे. वातावरण, नोतवाईक, मित्र व परिस्थिती इत्यादी त्याला नियंत्रित करतात. त्याचे मानसिक संतुलन नेहमी उतार-चढावात राहते कारण की, हे बाहेरील तत्व त्यांच्या नियंत्रणात नाही.

शाश्वत शांती, आनंद, प्रसन्नता आणि शक्तीचा अनुभव करण्याऐवजी तो क्षणिक आनंदाच्या अल्पकाळाच्या सुखांचा उपभोग घेत आहे. त्याचा बराचसा वेळ टी.व्ही. चॅनल, सिनेमा, विडीओ बघण्यात व्यक्तीत होत आहे, व आजचे चित्रपट हे हिंसाचार, मारधाड, आतंक, सेक्स यावर आधिरीत असतात. आजचा युवक अभ्यासात रस घेण्याऐजजी उपन्यासात एवढा डुबून राहतो की, दिवसभर स्वप्न बघतो आणि या सर्वांचा त्याच्या ह्रदय- मस्तिष्कावर एक छाप पडून राहत आहे.

वर्तमानकाळात युवकांची ज्वलंत समस्या आहेत. तंबाखु, अल्कोहल, ड्रग्स, जसे मोर्फीन, ब्राउनशुगर, कोकीन इत्यादी नंशाचा प्रयोग आहे. यामुळे इंद्रिय सुखांचे आकर्षण व विभिन्न कामना बे-लगाम घोड्याप्रमाणे दौडत आहे. ज्या विध्वंशात्मक प्रवृतीना वाढवित आहे. परिणाम स्वरुप गुणांची विकृती होत आहे. वर्तमान वस्तुस्थिती ही आहे की, सकारात्मक गुण नकारात्मक विकारांमध्ये बदलेले आहेत.

स्वमान अहंकारात बदलला आहे. जो आत्मकेंद्रिकरण व अभिमानाने प्रेरित होऊन न्यूक्लियर वॉर कडे जात आहे. आंतरिक आनंदाचे स्थान लोभाने घेतले आहे. ज्यामुळे अनेक अपराध वाढले आहेत, जसे भेसळ, लाचखोरी, इत्यादी आत्म्याची आंतरीक शक्ती क्रोधाचा वश झाल्यामुळे मनुष्य विवेकहीन व्यवहार करतो. व पशुवत व्यवहाराच्या मुळ प्रवृतीचे प्रदर्शन करतो. प्रेम, काम विकृतीत बदलते. काम विकारामुळे लोकसंख्या वाढ नको असलेले गर्भ, काम विकारामुळे पसरणारे रोग, जसे एड्स आदी. आंतरिक पवित्रता मोहात बदलते. यामुळे संग्रह प्रवृती व ईर्ष्या उत्पन्न होते व पद लालसा बनून राहते.

आनंदाची गोष्ट आहे की, परिस्थिती त्रासदायक असून, सुद्धा भौतिक दिव्यता हा सकारात्मक स्त्रोत जो युवकात दडलेला आहे. तो पुन्हा जागृत करुन कार्यात आणला जाऊ शकतो.

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स
www.bkvarta.com